नेहरू बाल पुस्तकालय



न्यू इंग्लिश स्कूल,
टिळक रस्ता, पुणे ३०.

# त्यांनी पाहिलेला भारत



नॅशनल बुक ट्रस्ट, इंडिया



# त्यांनी पाहिलेला भारत

के. सी. खन्ना

छाया चित्रे
कृष्ण खन्ना

अनुवाद
भा. रा. भागवत

नॅशनल बुक ट्रस्ट, इंडिया
नवी दिल्ली

ऑगस्ट 1971 (भाद्रपद 1893)
August 1971 (Bhadrapad 1893)

© के. सी. खन्ना, 1970

२८९८

मूल्य रु. 1.50

AS THEY SAW INDIA (Marathi)

वितरक :
भटकळ बुक्स इंटरनॅशनल, 35 सी ताडदेव रोड, मुंबई 34 डब्ल्यु बी

सेक्रेटरी नॅशनल बुक ट्रस्ट, इंडिया, ए–5 ग्रीन पार्क, नवी दिल्ली–16, यांनी प्रकाशित केले व मौज प्रिंटिंग ब्यूरो, खटाववाडी, गिरगाव, मुंबई 4 येथे छापले. चित्रे व कव्हराची छपाई, इंद्रप्रस्थ प्रेस, (सीं. बी. टी.) नवी दिल्ली येथे केली.

# मेगॅस्थनीज आणि भारत

दुसऱ्या लोकांना आपल्याबद्दल काय वाटते?

नेहमीच बुचकळ्यात टाकणारा हा प्रश्न. हजारो वर्षांपूर्वी आपल्या देशात जे लोक येऊन गेले त्यांचे वृतांत आपण येवढे रंगून जाऊन वाचतो ते याचसाठी. प्रवाशांच्या या कहाण्या दुसऱ्याही एका कारणामुळे मनोरंजक वाटतात. भारताच्या प्राचीन इतिहासाचे चित्र जसेच्या तसे पुन्हा रचून डोळ्यांपुढे उभे करणारे सर्वांत प्रभावी साधन म्हणून त्याचा उपयोग होऊ शकतो. तत्कालीन राजदरबारांच्या ऐश्वर्याच्या हकीकती, धार्मिक समारंभाची वर्णने आणि क्षुद्र कट-कारस्थानांचे तपशील वाचताना आपण एका अनोख्या जगात जातो. या जगात ऐटबाज राहणी, नृत्यांगना, डामडौल, निर्घृण हत्या व रासवट न्यायनिवाडा यांची रेलचेल असते. शिवाय त्या काळातल्या आर्थिक, राजकीय व सामाजिक स्थितीचाही त्यात आपल्याला पुरावा सापडतो.

भारताला वेगवेगळ्या कालखंडांत ज्यांनी भेट दिली अशा चौघा प्रवाशांविषयी हे पुस्तक आहे. ज्या परिस्थितीत व ज्या कारणांमुळे त्यांनी भारताला भेट दिली त्यांचा प्रभाव त्यांच्या लेखनावरही पडला आणि त्यांचे बरेचसे ग्रह जे तयार झाले ते त्यामुळे, हे विसरून चालणार नाही. उदाहरणार्थ : मेगॅस्थनीज आणि अलबरुनी दोघेही दरबारी पंडित होते, त्यामुळे त्यांनी येथील आर्थिक व सामाजिक परिस्थितीवर जास्त

भर दिला; तर फा-हिएन आणि ह्यूएन त्सांग हे दोघे चिनी भिक्षू असल्यामुळे त्यांना येथील धार्मिक बाबींकडेच लक्ष द्यावेसे वाटले.


भारतात येऊन गेलेला पहिला महत्त्वाचा प्रवासी म्हणजे मेगॅस्थनीज. बरीच वर्षे तो येथे राहिला आणि आपला देश व आपले लोक यांच्याविषयीं त्याने 'इंडिका' पुस्तकात बरेच काही लिहिले.

मेगॅस्थनीज भारतात कशासाठी आला ?

जवळ जवळ 2400 वर्षांपूर्वीची गोष्ट. शिकंदर बादशाहाने भारताचा काही मुलूख जिंकला; पण पुढे सम्राट चंद्रगुप्त मौर्य याने तो परत जिंकून घेतला. हा मुलूख पुन्हा मिळविण्यासाठी शिकंदराचा सेनानी सेल्यूकस निकेटर याने बरीच धडपड केली; पण चंद्रगुप्ताने खिस्तपूर्व शके 305 मध्ये त्याचा पराभव केला. यावेळी दोघांत समेट झाला, इतकेच नाही तर एका विवाहाने त्याची गोड परिणती झाली. मग सेल्यूकसने चंद्रगुप्ताच्या दरबारात आपला वकील म्हणून मेगॅस्थनीजला पाठवले.

पाटलिपुत्र नगरात (हल्लीच्या पाटणा शहराजवळ) मौर्य सम्राटांच्या दरबारीच मेगॅस्थनीज राहिला. आणि त्याने देशभर दौरे काढले. भारताचे आकारमान व आकृती यांचे त्याने केलेले वर्णन आजच्या आपल्या माहितीशी बरेच जुळणारे आहे. गंगा व सिंधू या आपल्या दोन मोठ्या नद्यांचे त्याने निरीक्षण केले. पावसाळ्यात या दोन्ही नद्यांना पूर आलेला असे, तेवढा काळ सोडला तर एरव्ही गंगा, सिंधू व त्यांच्या उपनद्यांमधून नौकांची ये-जा सारखी चालू असे. आजच्यापेक्षा त्या काळी जलमार्ग पुष्कळच जास्त प्रमाणावर वापरीत असत असे दिसते. रस्त्यांचाही वापर होत असे, आणि त्यात सर्वांत प्रसिद्ध मार्ग म्हणजे वायव्येकडून पाटलिपुत्रपर्यंत आलेला राजमार्ग होता. छायावृक्ष, पाट्यांचे खांब, विश्रामगृहे व विहिरी यांनी शोभिवंत झालेला हा मार्ग म्हणजे आजच्या ग्रँड ट्रंक रोडचे पूर्व चिन्ह होते असे म्हणायला हरकत नाही.





मेगॅस्थनीजने वर्णन केलेला प्रचंड वटवृक्ष

भारतात जे विविध प्रकारचे वृक्ष असत त्यांच्याबद्दलही या प्रवाशांचे कुतूहल जागृत झाले होते. वडाच्या झाडाचे तर त्याला फारच आकर्षण वाटले. जमिनीच्या दिशेने जाणाऱ्या व जमिनीतच पुन्हा मूळ धरणाऱ्या त्याच्या फांद्या याचा त्याला मोठाच अचंबा वाटे. मेगॅस्थनीज म्हणतो, "हे वृक्ष इतके प्रचंड असतात की पाच


माणसे त्याला विळखा घालू शकणार नाहीत." एका विशिष्ट वटवृक्षाचे वर्णन करताना तो म्हणतो "या झाडाची छाया इतकी विशाल आहे की दुपारच्या वेळी चारशे घोडेस्वार सहज त्या सावलीत आराम करू शकतात."

भारताचे हवामान चांगले होते. जमीन सुपीक होती आणि ती वर्षाकाठी दोन पिके देई. गहू, जव आणि कडधान्ये ही पिके हिवाळ्यात होत; तर अंबाडी, ज्वारी, तीळ आणि तांदूळ पावसाळ्यात होत. दोन दोन पिकांचे उत्पादन पाहून मेगॅस्थनीजला अचंबा वाटला असावा. मधमाश्या नसताना 'गोड मध' निघायचा याबद्दलही त्याने आश्चर्योद्गार काढले आहेत. हा मध म्हणजे उसापासून तयार केलेला गूळ असावा. झाडावर फुलणारी 'लोकर' (हा कापूस असणार हे उघड आहे) पाहूनही त्याला असेच नवल वाटले होते. मेगॅस्थनीज म्हणतो की 'भारतात सोन्याच्या समृद्ध खाणी आहेत. आणि इथे मोती मिळण्याची ठिकाणे भरपूर आहेत.' तो पुढे म्हणतो, 'पाश्चात्य देशांत मोत्यांना फार मोठी मागणी आहे. वजनात सोन्याच्या तिप्पट भावाने मोती खरेदी करतात.'

येथील प्राणिसृष्टीचे वर्णनही त्याने विविध प्रकारांनी केले आहे. पूर्व भारतातील बलशाली वाघाचे जे चित्र त्याने रंगविले आहे ते पाहिल्यावर शाही बंगाली वाघाचा हा कुलपुरुष असावा असे वाटते. त्याने वर्णिलेल्या वानरवंशात लांब शेपटीचे काळतोंडे लंगूर माकड आहे आणि पक्षी जगात बोलके पोपट आहेत. रथाला जे अश्व जोडीत त्यांना हल्लीच्या घोड्यांप्रमाणेच शिकवून तयार केलेले असे. त्यासाठी डोळ्यांना झापड बांधून त्यांना रिंगणात फिरायला लावीत.

भारतात रानहत्तींचा तुटवडा नसे. त्यांना पकडून लढाईच्या दृष्टीने तालीम देत. हे हत्ती पकडण्याची पद्धत मोठी विलक्षण होती. बरीच मोठी विस्तीर्ण सपाट जागा पाहून तिच्या सभोवती चर खोदीत, चरावर एकाच जागी फळ्या टाकून पूल केलेला असे. पुलावर माती व पालापाचोळा पसरून तो झाकून टाकीत. मग काही चांगल्या शिकविलेल्या हत्तींना मधल्या जागेवर उभे करीत. रात्री ते किंचाळू लागले की





घोड्यांना डोळे बांधून शिकवीत असत

रानहत्तींच्या कळपाचे साहजिकच तिकडे लक्ष जाई. ते पुलावरून आत जात व सापळ्यात शिरत. चराच्या आसपास खोपटे बांधून त्यांत शिकारी लोक पाळतीवर बसलेले असत. ते लगेच 'पूल' उद्ध्वस्त करीत आणि लोकांची मदत बोलावीत. गावकरी शिकलेल्या हत्तींवर स्वार होऊनच मदतीला येत. रानटी हत्तींना पहिल्याने उपाशी ठेवून दुबळे करीत; मग त्यांच्यातली लढण्याची ताकद खचली म्हणजे शिकलेले व पोसलेले हत्ती त्यांच्यावर तुटून पडत. रानहत्ती खाली पडला की



प्राचीन भारतीय वेषभूषा

शिकारी त्याच्या गळ्याभोवती दोर अडकवीत. दोर पक्का बसावा म्हणून गळ्याला एक खोल चीर पाडून त्या चिरेत तो बांधीत. मग त्याच्यावर स्वार होऊन शिकारी गावाकडे परत जात. पाठीवरच्या स्वाराला खाली भिरकावून देण्याची हत्तीची शामत नसे; कारण जखमेमुळे मान जरा हलविली की यातना होत.

भारतीयांबद्दल मेगॅस्थनीज म्हणतो की, भारतवासी बहुधा उंच व सडपातळ असत. बहुतेकांचा पोशाख म्हणजे पांढरे शुभ्र सुती वस्त्र असे आणि ते त्यांच्या कृष्णवर्णाला शोभून दिसे. पोशाखाचा खालचा भाग म्हणजे पांढरे धोतराचाच एक प्रकार असावयाचा. वरचे वस्त्र किंवा उत्तरीय खांद्यावरून मागे टाकलेले असे आणि कधी कधी ते डोक्यावरूनही घेत.



श्रीमंतांमध्ये मात्र रंगीत कपडे वापरण्याची पद्धत होती. ते आपल्या दाढ्यांनाही निरनिराळे रंग देत. पांढरा, निळा, जांभळा, हिरवा. कानांत ते हस्तीदंती कुंडले घालीत आणि अंगावरही रत्नजडित सुवर्णालंकार मिरवीत. अंगावर फुले घालण्याचीही त्यांना आवड असे. जाड तळाचे पांढऱ्या चामड्याचे चढाव ते पायांत घालीत आणि उन्हापासून संरक्षण म्हणून बरोबर सुबक छत्र्या घेत.

ते आरोग्यसंपन्न व दीर्घायुषी लोक असत. याला कारण त्याच्या मते भारतीयांचा साधा आहार. यज्ञासारखा प्रसंग सोडला तर एरव्ही ते मद्य पीत नसत; आणि यज्ञात-सुद्धा साधी भाताची दारू दिली जाई. आजाराच्या किंवा काळजीच्या प्रसंगी लोक योग्यांचा व ब्राम्हण पंडितांचा सल्ला घेत. हे योगी किंवा वानप्रस्थी लोक रानावनांत राहात, वल्कले किंवा झाडांच्या साली नेसत आणि रानटी कंदमुळे खात. औषधे म्हणून बहुधा वनस्पतींच्या मुळ्या किंवा फुले वापरीत आणि तऱ्हेतऱ्हेचे व्यायाम करीत.

मेगॅस्थनीज म्हणतो, "भारतीय स्त्रिया सद्गुणी असतात; पण एखाद्या धनिकाला एकीपेक्षा अधिक बायका असल्या तरी त्याच्याशी पैशासाठी लग्न करण्याकडे त्यांचा कल असतो. त्या लवकर वयात येतात आणि त्यांची लग्नेही लवकर होतात." मुलींना वेदविद्या शिकवीत नसत. हुंड्याची पद्धत नव्हती. मेगॅस्थनीजला विशेष आश्चर्य वाटले ते एका पद्धतीचे. जे गरीब आईबाप आपल्या मुलींचे लग्न करून देण्यास असमर्थ ठरत ते त्यांना बाजारात विक्रीसाठी ठेवत असत.

मेगॅस्थनीज येथील जात-भेदाची पद्धत पाहून गोंधळून गेला असे दिसते. "लोकांचे त्यांच्या व्यवसायानुसार सात वर्ग पाडलेले आहेत." असे तो म्हणतो. हे वर्ग म्हणजे विद्वान पंडित, शेतकरी, धनगर किंवा गुराखी, कारागीर आणि व्यापारी, सैनिक, देखरेख करणारे किंवा हेर, आणि शेवटी सल्लागार किंवा वसुली करणारे आयुक्त. तो पुढे म्हणतो, "आपल्या जातीबाहेर लग्न करायला कोणालाही परवानगी नसते. तसेच आपला व्यवसाय बदलून दुसरा व्यापार धंदा करायला किंवा एकापेक्षा अधिक

व्यवसाय करायलाही बंदी असते." भोजनप्रसंगी हे वर्ग परस्परांत मिसळत नाहीत असे त्याने नमूद केले आहे.

भारतीय स्वभावविशेषाबद्दल मेगॅस्थनीजला कौतुक वाटत होते यात शंका नाही. तो म्हणतो की, "जनता म्हणून भारतीय लोक फार शिस्तीने वागतात. फालतू लोकक्षोभ त्यांना आवडत नाही. ते इतके प्रामाणिक असतात की सामान्यतः घराला कुलूप लावण्याची कोणाला गरज भासत नाही. चोऱ्या जवळजवळ होतच नाहीत." तो आणखी सांगतो की भारतीयांपाशी कागदोपत्री लिहिलेले कायदे नाहीत. चालीरीती व परंपरा यांना अनुसरून ते व्यवहार करतात. लेखी करारमदारांची त्यांना जरूर वाटत नाही; आणि कायद्याचे संरक्षण मागण्याचीही त्यांना इच्छा नसते. उद्योग धंद्यातले ठराव करताना मनुष्याचा शब्द ते खरा मानतात. सद्‌गुणांना फार मोल असते. सत्याला एवढी प्रतिष्ठा दिली जाते की खोटया साक्षी देणारांचे हातपाय तोडतात. आपल्यातल्या शहाण्या विद्वानांचा ते आदर करतात. आपल्यातल्या थोर महात्म्यांचे ते गुणगान गातात आणि त्यांच्या पावलावर पाऊल टाकून जाण्याचा त्यांचा प्रयत्न असतो.

गंगा नदीच्या तीरावर वसलेले पाटलिपुत्र म्हणजे खरोखरीच एक भव्य नगरी होती. नऊ मैल लांब आणि दीड मैल रुंद असा तिचा विस्तार होता. शहराच्या सभोवती एक लाकडी तट बांधलेला असून त्याला 64 वेशी होत्या आणि 570 बुरूज होते. तटाच्या भोवतालून खोल खंदक होता, त्यामुळे बाहेरच्यांना आत येण्यास प्रतिबंध होत असे. घरे दुमजली वा तिमजली होती. ती लाकडाची असल्याने आगीपासून त्यांचे संरक्षण करण्याच्या दृष्टीने खास पद्धत काळजीपूर्वक आखण्यात आली होती.

शहराच्या मध्यभागी भव्य राजवाडा असून त्याच्या सभोवती रमणीय पण बंदिस्त बगीचा असे. त्यात माशांचे तलाव होते. हा राजवाडा लाकडाचा असून रत्नखचित सुवर्णाने मढविलेला होता. राजा सोन्याच्या पालखीतून संचार करी. त्याचा पोशाख मऊ मलमलीचा असून त्याच्यावर सोन्याचे जरी काम केलेले असे.






गरीब लोकांची प्रवासाची पद्धत

बरेचसे लोक त्याच्याबरोबर घोड्यावरून जात. सुखवस्तू असतील ते उंटावरून जात. पण गाढवावर बसणे मात्र तुच्छ व हलके समजत असत. धनिक वर्ग हत्तींचा आणि कधी कधी रथांचाही वापर करीत असत. त्यांचे आवडीचे छंद होते बैलांच्या शर्यती, जुगार, प्राण्यांच्या झुंजी आणि पैलवानांच्या कुस्त्या. सर्वसामान्य जनता सुखात होती व श्रीमान लोक चैनीत असून आरामशीर जीवन जगत होते. मेगॅस्थनीजने लिहले आहे की श्रीमंत लोक आपल्या शरीराला शिसवीच्या गुळगुळीत लाकडाने मालीश करवून घेत.

शिशवीच्या लाकडाने मालीश



येवढे सामर्थ्य व संपत्ती जवळ असूनही, आपला खून होईल की काय या विवंचनेत राजा सदैव असे. स्वतःच्या सुरक्षेसाठी तो विलक्षण खबरदारी घेई; खाण्याचे सर्व पदार्थ त्याच्या समोर खाऊन पाहण्यात येत असत. तसेच एकाच खोलीत लागोपाठ दोन रात्री तो झोपत नसे. वाड्यात सशस्त्र महिलांचा पहारा असे. तसेच वाड्याबाहेर शिकारीला गेल्यास त्याच्या मार्गाभोवती दोरखंड लावण्यात येत असे व तो दोरखंड ओलांडणाऱ्यास देहांत शासन दिले जाई. शहरातील बित्तंबातमी हेरामार्फत पुरविण्यात येई.

साम्राज्याच्या संरक्षणासाठी चंद्रगुप्ताजवळ सात लाख सैनिकांची प्रचंड खडी सेना होती. तिचे सहा विभाग पाडले असून त्यांवर देखरेख करण्यासाठी तीस अंमलदारांचे एक मंडळ असे. हे विभाग असे : (1) नौदल किंवा आरमार (2) वाहतूक आणि पुरवठा (यातच मजुरांचा समावेश असे). (3) पायदळ. (4) घोडदळ (5) रथ (बैलांनी ओढण्याचे) (6) गजदल किंवा हत्ती.

त्या काळात युद्धविद्या गुंतागुंतीची नसे. युद्धकाळात शेतकऱ्यांची जमीन-नांगरणी चालूच असे. सबंध देशाला युद्ध भोवत नसे. समोरासमोर लढाया होत आणि त्यात उभय पक्षांचे भवितव्य काय ते ठरे. हत्ती फार महत्त्वाची कामगिरी बजावीत. पायदळातले सैनिक स्वतःच्या उंचीयेवढे धनुष्य जवळ बाळगीत आणि 9 फूट लांबीचे बाण वापरीत. हे पदाती प्रतिपक्षावर बाणांचा वर्षाव करीत आणि नेमबाजीबद्दल त्यांची फार ख्याती होती. मेगॅस्थनीज म्हणतो, "भारतीय तीरंदाजाचा नेम चुकवील अशी कोणतीही वस्तू नाही—ढाल, छातीचे चिलखत किंवा दुसरे काही याहून भक्कम कवच असले तरी तेही या बाणांचा प्रतिकार करू शकत नाही." एकमेकांशी भिडून लढताना सैनिक एक प्रकारची लांबलचक चिंचोळी बैलाच्या कच्च्या कातड्याची ढाल वापरीत—ती डाव्या हातात धरलेली असे. काहीजण धनुष्याऐवजी फेकून मारण्याचा भाला वापरीत. पण प्रत्येकाजवळ रुंद पात्याचे एक खड्ग मात्र अवश्य असे. हे खड्ग किंवा तलवार साडेचार फुटांपेक्षा जास्त लांब नसे, आणि ती दोन्ही हातात धरून ते वार करीत.




घोडेस्वार घोड्याच्या उघड्या पाठीवर बसून जात. त्यांच्या हातांत दोन लांब भाले आणि एक कातड्याची तोकडी ढाल येवढी आयुधे असत. घोड्याच्या तोंडात लगाम घालण्याऐवजी त्याच्या तोंडाभोवती बैलाच्या कच्च्या कातड्याचे आवरण गुंडाळलेले असे. त्याला अणकुचीदार आऱ्या असत. हा प्रकार घोड्याला क्लेशदायक खरा, पण त्यामुळे त्याला टोचणी मिळून तो नीट धावे.

युद्धात वापरण्याची जनावरे व शस्त्रे ही दोन्ही राजाच्या मालकीची असत आणि काम संपले की ती अनुक्रमे पागेत व शस्त्रागारात ठेवावी लागत. अंतर्गत बंडाळ्या व परचक्र या दोन्ही संकटांची तलवार डोक्यावर सतत टांगलेली असल्यामुळे, आपल्या अवाढव्य साम्राजावरची पकड टिकविण्यासाठी सम्राट आपले प्रचंड व बलाढ्य सैन्य सतत सज्ज ठेवीत असे.

सैन्यातील अंमलदारांप्रमाणेच आयव्यय अधिकारी असत. ते संबंध देशाचा कारभार पाहात. भाग किंवा करआकारणीसाठी तसेच वारसाहक्क ठरविण्यासाठी ते जमिनीची मोजणी करीत. नद्यांमधून होणाऱ्या वाहतुकीत ते सुधारणा करीत आणि खाण कामगार व कारागीर यांच्या कामावर देखरेख ठेवीत. करवसुलीचे काम त्यांचेच असे. शिवाय ते रस्ते बांधवून घेत आणि अंतर व दिशा दाखविण्यासाठी दर तीन चार मैलांवर मैलाचे दगड उभे करीत.


खुद्द पाटलिपुत्र नगराचा कारभार नगरपाल पाहात. त्यांचे सहा गट असून प्रत्येक गटात पाच अधिकारी असत. राजधानीत राहणाऱ्या परदेशी लोकांची उत्तम व्यवस्था ठेवली जाई. एकूणएक जन्म-मृत्यू नोंदले जात. त्यामुळे शिरगणती सुलभ जाई. अधिकारी ललितकला व हस्तकौशल्याची कामे यांची पाहणी करीत. वजने-मापे ठरवून दिलेली होती आणि बाजारपेठांत विक्री कशी होत आहे यावर नजर ठेवली जाई. राज्याला येणे असलेले सर्व कर वेळच्या वेळी वसूल केले जात.

गूढतेचे व रम्यतेचे वलय यापूर्वीच भारताभोवती विणले जात होते आणि मेगॅस्थनीज हा एकंदरीत पुष्कळच भावुक माणूस होता असे दिसते. त्याला ज्या काही अचाट




सोनें खणून काढणाऱ्या मुंग्या !





विराट पंखांचा विंचू


गोष्टी सांगण्यात आल्या त्या सर्वच्या सर्व खऱ्या मानून, कोणताही विनोद वगैरे न करता त्याने त्या नमूद केल्या आहेत. भारतात चमत्कारिक प्राणी चिकार आहेत असे तो सांगतो. उदाहरणार्थ : सिंधू नदीच्या दक्षिण खोऱ्यांत–जिथें देरदाय राहतात–सोने उकरून काढणाऱ्या मुंग्या आहेत. कोल्हयायेवढया मोठ्या आकाराच्या या मुंग्या बिळे पाडतात आणि बिळाबाहेर येताना खूपशी–सोन्याची धूळ बरोबर आणतात. आसपासचे लोक ती धूळ वेचण्यासाठी पशूंवर स्वार होऊन येतात. मुंग्यांना खायला पशूच्या मांसाचे तुकडे पसरून ठेवून ते मुंग्यांचे लक्ष तिकडे गुंतवून ठेवतात व लगेच



मेगॅस्थनीजने उल्लेखलेला चमत्कारिक कुत्रा

ती धूळ वेचून घेतात. कधी कधी ही गोष्ट या कानाची त्या कानालाही समजत नाही; परंतु तेच त्या मुंग्यांनी त्यांना कधी पाहिले तर त्यांचा पाठलाग करून त्यांना गाठून त्यांना व त्यांच्या पशूंनाही त्या यमसदनाला पाठवतात. मेगॅस्थनीजने उल्लेख केलेले आणखी काही नमुने पाहा : वटवाघळासारखे पंख असलेले एक वारभर लांबीचे सर्प, प्रचंड आकाराचे पंखवाले विंचू आणि एका विशिष्ट जातीचे कुत्रे—जे इतक्या तीव्रतेने चावा घेतात की त्या जोषामुळे त्यांचे स्वतःचे डोळे खाचांबाहेर लोंबू लागतात






लांबलचक कान व कपाळावर डोळा असलेला राक्षसी माणूस

या कपोलकल्पित प्राण्यांखेरीज नऊ फूट उंचीच्या राक्षसी माणसांचीही माहिती त्याने दिली आहे. "त्या माणसांना नाकपुड्याच नसतात. माणसांचे कान इतके लांब असतात की ते झोपले म्हणजे त्यांचे कान पायांना लगतात." दुसरी काही माणसे अशी विचित्र आहेत की त्यांच्या पायाची टाच पुढच्या बाजूला असते. कुत्र्याचे कान असलेले लोक आणि कपाळावर मध्यभागी डोळा असणारी माणसे यांनाही त्याच्या वृत्तांतात स्थान मिळाले आहे.

एक शिलालेख



मेगॅस्थनीजने रंगविलेल्या चित्राचे साररूपाने वर्णन करायचे तर असे म्हणता येईल की मौर्य साम्राज्यात एक सुसंघटित अशी खातेविभागणी तयार झालेली होती. आणि या कारभारयंत्रणेची राज्यातल्या बहुविध आर्थिक जीवनावर प्रभावी पकड बसलेली होती. करआकारणीची एक नियमबद्ध पद्धत होती; आणि सर्व सरकारी कागदपत्रे व आलेख यांचे अतिशय हुशारीने जतन केले जाई. कायदा व सुव्यवस्था उत्तम असे—त्या बाबतीत मोठीशी समस्या अशी कधीच उद्भवली नाही. लोक सामान्यत: सचोटीने वागत. ज्या थोड्या चोऱ्यामाऱ्या वा अत्याचार होत त्यांना कडक शासन केले जाई. न्यायदान फार तडफीने होत असे; ते खुल्या दरबारात चाले आणि राजा स्वत: न्यायाध्यक्ष असे. सर्वसामान्य जनता सुखी होती आणि राजदरबाराच्या अवतीभवती जे राजकारण चाले किंवा कट शिजत त्यांच्याशी लोकांचा क्वचितच संबंध येत असे.

मौर्य काळातली नाणी



## भारतात फा-हिएन

फा-हिएन चीनमधील एक बौद्ध ' भिक्षू होता. मेगॅस्थनीजच्या नंतर जवळजवळ 700 वर्षांनी तो भारतात आला. 'बौद्ध राज्यांचा वृत्तांत' हा त्याचा ग्रंथ. त्यात 1500 वर्षांपूर्वीच्या भारताविषयी त्याने पुष्कळच लिहून ठेवले आहे.

भारताला भेट देणाऱ्या या पहिल्याच महान चिनी यात्रेकरूची कथा मोठी मनोरंजक आहे. फा-हिएनच्या आईबापांची फार इच्छा होती की आपल्या मुलाने बुद्ध भिक्षू (श्रमण) व्हावे; म्हणून त्यांनी त्याला एका मठात शिक्षणासाठी पाठविले. तेथे वयाच्या दहाव्या वर्षीच तो पोरका झाला. पण आपले मठातले शिक्षण चालू ठेवायचे त्याने ठरविले. एक दिवस इतर मुलांबरोबर तो शेतातले भात कापीत असता लुटारूंनी हल्ला केला. बाकीचे मुलगे घाबरून पळून गेले. एकटा फा-हिएन जागचा हालला नाही. चोरांशी तो बोलला. म्हणाला, "पूर्वजन्मात तुम्ही काही तरी वाईट कर्मं केलीत, म्हणून तुम्ही चोर झालात. असेच अनीतीने वागत राहिलात तर तुमचं भविष्य आणखीच काळोखाचं होईल." फा-हिएनच्या शब्दांचा चोरांच्या मनावर परिणाम झाला. भात न नेताच ते निघून गेले.

विसाव्या वर्षी फा-हिएनचे शिक्षण पुरे होऊन तो पक्का श्रमण बनला, आणि पाच वर्षांनंतर म्हणजे इ. स. 399 मध्ये त्याने भारताला जायचे ठरविले. चौदा वर्षे तो घराबाहेर होता. त्यांतील सहा वर्षे त्याने प्रवासात घालविली. सहा वर्षे तो भारतात




फा-हिएनच्या प्रवासाचा नकाशा

होता, आणि दोन वर्षे लंकेत किंवा सीलोनमध्ये. डोंगरदऱ्यांतून हजारो मैलांची पायपीट त्याने केली आणि महासागर ओलांडले. एक निष्ठावंत बौद्ध या नात्याने बुद्धाच्या पवित्र तीर्थांचे दर्शन घेणे, तसेच बुद्धविषयक ग्रंथ व अवशेष गोळा करणे हा त्याचा मूळ हेतू. बौद्ध धर्माचा चीनमध्ये प्रवेश झाल्यावर तेथे अनेक विहार किंवा मठ स्थापन झाले होते आणि काही पवित्र ग्रंथांची चिनी भाषेत भाषांतरेही झाली होती. तरीपण जीवनात कोणत्या प्रकारची आचारसंहिता पाळावी याबद्दल चिनी भिक्षूंना अजून खात्री वाटत नव्हती. शिवाय भगवान बुद्धाने जी शिकवण दिली तिचा निश्चित अर्थ त्यांना समजून घ्यायचा होता. या तळमळीमुळे कितीतरी बुद्धभिक्षू व पंडित भारतात येत असत.


येथे, मेगॅस्थनीजच्या काळानंतर ज्या घटना घडल्या होत्या त्यांचा आपण थोडक्यात आढावा घेऊ या. मौर्यांच्यानंतर कुशान नावाच्या परकीय टोळ्यांनी भारतात राज्य केले. कनिष्क हा त्यांचा राजा. त्याचे विशाल साम्राज्य मध्य आशियापासून ते मथुरेपर्यंत पसरले होते. कनिष्क बुद्धाचा अनुयायी होता. साहजिकच बौद्ध धर्माचा प्रचार त्याने आपल्या सर्व प्रांतांमधून केला. तेथून पुढे चीन आणि अन्य देशांतही त्याचा प्रसार झाला. फा-हिएन दौऱ्यावर निघाला त्यावेळी कुशानांचे साम्राज्य लोप पावून अनेक वर्षे झाली होती. पण बौद्ध धर्म जिथे जिथे गेला तिथे त्याने चांगले मूळ धरले होते.

कनिष्काला जाऊन तीनशे वर्षे लोटल्यावरसुद्धा खोतान (हल्लीचा सिनकियांग) प्रांतातला मुख्य धर्म तोच होता. फा-हिएनला असे आढळले की तेथील विहारांमधून हजारो भिक्षू व्रतस्थ जीवन घालवीत आहेत. एक विहार तर असा होता की त्याच्या बांधकामाला 80 वर्षे लागली होती — तीन राजांच्या कारकीर्दीत हे काम सारखे चालू होते. या विहारातले बुद्धाचे सभागार उत्कृष्ट काम व सुंदर जडीव काम यांनी शोभिवंत होते. या भव्य सभागृहाच्या तुळ्या, खांब, दरवाजे व खिडक्या यांवर पाने जडविलेली होती ती सोन्याची होती. भिक्षूंच्या वापरासाठी खोल्या

होत्या त्याही इतक्या सुशोभित होत्या की त्यांचे वर्णन करायला फा-हिएनला शब्दच सुचेनात.

विहारातले भिक्षू घंटा वाजली की जेवायला जमत. सर्वजण आवाज न करता आसनावर बसत, अन्न मागवीत ते हाताच्या खुणा करून. धार्मिक मिरवणुकीचे फा-हिएनने केलेले वर्णन नेहमीपेक्षा निराळे नाही. उत्सवप्रसंगी बुद्धाच्या व हिंदू देवतांच्या मूर्ती रथातून नेत. रथ रेशमी छत्र व पताका यांनी शृंगारलेले असत. राजाराणी धूप जाळून व फुले वाहून आरती करीत आणि मग आपली संपत्ती दान करीत.

भोजनास बसलेले भिक्षू







बुद्धाचे भिक्षापात्र, चंदनी काठी इ.

फा-हिएन भारतात आला तेव्हा चंद्रगुप्त विक्रमादित्य राजा होता. काश्मीरमधल्या स्कार्दो गावी राजाने पंच परिषद—दर पाच वर्षांनी घेण्याची सभा—भरविली होती. तिचा समारोप झाल्यावर राजाने व मंत्र्यांनी भिक्षूंना देणग्या दिल्या. तेथील एका विहारात फा-हिएनला तऱ्हेतऱ्हेचे पवित्र अवशेष दिसले. तथागताचे म्हणजे बुद्धाचे एक तस्त आणि बुद्धाचा एक दात या दोन वस्तू त्यांत होत्या. गांधारात एका खडकावर बुद्धाच्या पावलाचा ठसाही त्याने पाहिला. पुरुषपुर (पेशावर) येथे कनिष्काने बांधलेला प्रचंड स्तूप त्याला बघायला मिळाला. इथेच दुसऱ्या एका भव्य स्तूपात तथागताचे भिक्षापात्र, त्याच्या कवटीचे हाड आणि त्याची चंदनाच्या लाकडाची एक काठी पुजून ठेवलेली त्याने पाहिली. या सर्व पूजेच्या वस्तू खऱ्या; पण फा-हिएन सर्वांत प्रभावित कशाने झाला असेल तर तो एका गुंफेत पाहिलेल्या दृश्याने. तो म्हणतो,

"मी इथे भगवान बुद्धाची खरी आकृती पाहिली. तथागताची सोन्यासारखी शरीरकांती मला दिसली." बौद्ध लोकांची अशी समजूत होती की बुद्धाने जाण्यापूर्वी आपली छाया या ठिकाणी मागे ठेवली; ती फक्त श्रद्धाळू यात्रिकांनाच दर्शन देते.

मथुरेच्या वाटेवर फा-हिएनला अनेक विहार लागले. हजारो भिक्षू त्यांत राहात असत. धार्मिक सहिष्णुता हा प्राचीन भारताचा एक खास गुण होता. फा-हिएनला असे दिसून आले की कुठेही गेले तरी राजा व धनिक वर्ग हिंदू धर्मीय असूनही बुद्ध भिक्षूंबद्दल ते आदर बाळगीत, त्यांना दानधर्म करीत आणि त्यांच्या मठांना जमिनी देत.

मध्य देशात फा-हिएनला अशी किती तरी स्थळे आढळली की जी बुद्धाच्या वास्तव्यामुळे पुनीत झालेली होती—कुठे बुद्धाने स्नान केले, कुठे केस कापले, कुठे नखे कापली, वगैरे. भगवान बुद्धाने केलेले चमत्कार म्हणून जे फा-हिएनला ऐकायला मिळाले तेही निःशंकपणे त्याने नमूद केले आहेत.

बुद्ध विहारातल्या राहणीचा एक मोठा विशेष होता. तो असा की बौद्ध धर्मातील निरनिराळ्या पंथांचे भिक्षू व भिक्षुणी शेजारी शेजारी राहात असत. त्यांची मते भिन्न असली तरी ते सहिष्णू असत आणि वाटेने जाणाऱ्या सगळ्याच भिक्षूंचा व पांथस्थांचा ते भेदभाव न करता पाहुणचार करीत.


आणखी एक महत्त्वाची गोष्ट फा-हिएनने नमूद केली आहे. कोसल देशाचा राजा प्रसन्नजित हा बुद्धाचा समकालीन होता. त्यानेच प्रथम बुद्धाची चंदनाची मूर्ती बनविली; तिची पूजाही होत असे. म्हणजे खुद्द बुद्धाच्याच काळात किंवा फार तर बुद्धानंतर थोड्याच वर्षांनी मूर्तिपूजेला या धर्मात थोडे स्थान मिळू लागले.

कपिलवस्तू, श्रीवस्ती, राजगृह आणि गया यासारखी बौद्धांची पवित्र स्थळे ओस



पडल्याचे फा-हिएनला आढळले. पाटलिपुत्राचे 'पुष्पनगरी' म्हणून तो वर्णन करतो आणि म्हणतो, "बौद्ध धर्माचा महान कैवारी अशोक याने या शहरात 84,000 विहार बांधून त्यांची उत्तम व्यवस्था केली होती. राजवाड्याचे ऐश्वर्य पाहून थक्क झालेला फा-हिएन म्हणतो, "राजमहाल व त्याची सभागृहे अजूनही

२८९८



नालंदा


शहराच्या मध्यभागी पूर्वीच्या अवस्थेत उभी आहेत. हे बांधकाम करण्यासाठी अशोकाने जणू भुतांची योजना केली होती. मनुष्याच्या हातांना इतके उत्कृष्ट कोरीव काम व जडावाचे शिल्प करताच आले नसते." पाटलिपुत्राजवळ उभा असलेला सिंहमुखी अशोकस्तंभही फा-हिएनच्या कौतुकाचा विषय झाला आहे.

दक्षिणेत गेल्यावर फा-हिएनला आणखी एका नवलाईबद्दल ऐकायला मिळाले—कपोतविहार. प्राचीन भारतातील स्थापत्यकारांचे सर्व कौशल्य या शिल्पात प्रतिबिंबित झाले होते. एकाच अवाढव्य पहाडी खडकात खोदलेल्या या विहाराला पाच मजले होते. तळमजला हत्तीच्या आकाराचा होता. त्याची 500 दालने होती. दुसरा मजला सिंहाकृती होता. त्याची 400 दालने होती. तिसरा मजला घोड्याच्या आकाराचा असून त्याची 300 दालने होती. चौथा मजला बैलाच्या आकाराचा असून त्याची 200 दालने होती. सर्वांत वरचा मजला म्हणजे पाचवा मजला कबुतराच्या आकाराचा होता आणि त्याची 100 दालने होती. शिखरस्थानी एक झरा होता. त्याचे पाणी पाचही मजल्यांना पुरविले जाई. सर्व दालनांना प्रकाशासाठी खिडक्या होत्या. या विहारात फा-हिएन तीन वर्षे राहिला. तो संस्कृत शिकला आणि काही महत्त्वाचे ग्रंथही त्याने गोळा केले.

मध्य राज्यात—म्हणजे बहुतांशी हल्लीच्या उत्तर प्रदेशात—त्याही काळी दाट लोकवस्ती होती. तिथल्या न्यायदान पद्धतीची फा-हिएनने स्तुती केली आहे. तो म्हणतो, "शिरच्छेद किंवा (अन्य) देहदंडांचा वापर न करता राजा शासन करतो. अपराध्यांकडून फक्त दंड वसूल केला जातो; त्याचे प्रमाण (त्या त्या प्रकरणातील) परिस्थितीनुरूप कमीजास्त असते. विद्रोहाचे दुष्ट प्रयत्न करणारांचेही फक्त उजवे हात तोडले जातात." गुन्हेगारीचे प्रमाण बेसुमार नसेल तर शिक्षा कमी असे व सरकार सौम्य स्वरूप धारण करी.



कपोत मठ



आर्थिक परिस्थितीविषयी केवळ ओझरते उल्लेख फा-हिएनने केले आहेत; पण ते पुष्कळच उद्बोधक आहेत. "वस्तूंच्या खरेदीविक्रीसाठी लोक कवडया वापरतात." त्या काळी नाणी नव्हती असे नाही; पण बहुतेक वस्तू इतक्या स्वस्त असाव्यात की कवडयांवर भागत होते असे दिसते. "राजाचे शरीररक्षक व परिचारक या सर्वांना पगार मिळतो" यावरून असे दिसते की जमिनी इनाम देण्याचा प्रघात त्या काळी नव्हता. तो पुढे सुरू झाला.

गौरवाने लिहिताना फा-हिएन कधी कधी फारच वाहवत जातो. भारतातल्या अहिंसेबद्दल लिहिताना तो म्हणतो, "सबंध देशात कोणीही प्राण्यांची हत्या करीत नाही किंवा मद्यासारखी अमली पेये पीत नाही किंवा कांदा-लसूण खात नाही." सर्वच लोकांच्या बाबतीत हे खरे असणे शक्य नाही; राज्यकर्ते व सरदार मंडळी यांच्या बाबतीत तर नाहीच. कारण त्यांना शिकारीचा छंद असे हे आपल्याला माहीत आहे. "खाटकांची दुकाने नसतात आणि दारू विकणारे व्यापारीही आढळत नाहीत." हे खरे असले तरी चांडाळ व अस्पृश्य हे शिकार करीत आणि मांसही विकीत हे खुद्द फा-हिएनने मान्य केले आहे.

अस्पृश्यता सक्तीने पाळली जाई. अस्पृश्य हे समाजाचे अत्यंत नीच घटक मानले जात. चांडाळ हे शहराबाहेर राहात. आणि "वेशीत प्रवेश करताना किंवा बाजारात शिरताना ते काष्ठ वाजवून आपल्या आगमनाची ग्वाही देत; त्यामुळे लोक लगेच बाजूला होत, त्यांचा संपर्क टाळीत."

भारतातला मुक्काम पुरा केल्यावर फा-हिएन ताम्रलिप्तीहून लंकेला जायला निघाला. या जलप्रवासाला त्याला चौदा दिवस लागले. सिंहलद्वीपात तो दोन वर्षे होता; मग चीनकडे परतला. आपल्या परतीच्या प्रवासाचे चित्र त्याने इतक्या समर्थपणे रंगविले आहे की त्यावरून वाटेतल्या संकटांना त्याने किती धैर्याने तोंड दिले त्याची कल्पना येते.




"ही मंडळी पूर्वेकडे निघाली तेव्हा तीन दिवस वारा अनुकूल होता. मग अचानक जोराचा वारा वाहू लागला. जाहजाला फट पडली आणि पाणी आत येऊ लागले. व्यापाऱ्यांच्या मनात आले की आता छोट्या नौकेवर आश्रय घ्यावा. पण त्या नौकेवरच्या लोकांना भीती वाटली की जास्त माणसे येतील आणि नौका बुडेल. त्यांनी मधला जोडणारा दोर तोडून टाकला. व्यापारी अतिशय घाबरले. आपण आता मरणार अशी त्यांची खात्री झाली. जहाजात आणखी पाणी भरू नये म्हणून आपला जड माल उचलून त्यांनी भराभरा पाण्यात फेकला. फा-हिएनने पण आपली सुरई व हात धुण्याची थाळी तसेच आणखी काही वस्तू उचलल्या आणि समुद्रात टाकल्या....समुद्रावर (या भागात) चाचे लोक फार. त्यांच्याशी गाठ म्हणजे मृत्यूशीच गाठ. अमर्याद सागर पसरलेला आहे. पूर्व कोणती कळत नाही. सूर्य, चंद्र व तारे यांच्याकडे पाहातच पुढे जायचे. हवा काळोखी व पावसाची असली की (जहाज) वाऱ्याबरोबर ते कुठेही भरकटत जाई. निश्चित मार्ग असा राहिलाच नव्हता. रात्रीच्या अंधारात फक्त लाटा दिसत. त्या एकमेकीवर आदळत आणि त्यांच्यातून अग्नीसारखे तेज निघे. अवाढव्य कासवे आणि इतर सागरी राक्षस (सर्वत्र) धिंगाणा घालताना दिसत. व्यापारी भयभीत झाले होते. आपण कुठे चाललो आहोत याचा यांना पत्ताच नव्हता. समुद्राची खोली अपार होती. नांगर टाकण्यासारखी जागा कोठेही आढळत नव्हती. पण मग जेव्हा आकाश निवळले तेव्हा त्यांना पूर्व-पश्चिम कळू लागली; आणि (जहाज) योग्य दिशेने मार्ग आक्रमू लागले. दरम्यान एखाद्या लपलेल्या खडकावर जर ते आदळले असते तर मरणाशिवाय दुसरा मार्ग नव्हता."

फा-हिएनच्या वृत्तांताचा पुष्कळसा भाग जरी बुद्धाच्या तीर्थस्थळांना वाहिलेला असला तरी त्याने सहज केलेल्या उल्लेखांवरून सुद्धा आपल्याला पाचव्या शतकातल्या भारताबद्दल बहुमोल माहिती मिळते. गुप्त सम्राटांच्या सौम्य राजवटीत देशाला शांतता व समृद्धी लाभलेली होती. गुन्हेगारी जवळजवळ नव्हतीच. एकंदर



चित्र जे डोळ्यापुढे उभे राहते ते असे की बौद्ध धर्म जरी भारताबाहेरच्या देशात अजून भरभराटीत होता. तरी त्याच्या जन्मभूमीत त्याला पूर्वीचा मोठेपणा आणि राजाश्रय राहिला नव्हता. हिंदूधर्म पुन्हा उत्कर्ष पावत होता. लोकांच्या जीवनात धर्माला अत्युच्च स्थान होते आणि तरी धर्मावरून कलह माजत नसत. सणाच्या दिवशी बुद्धदेवाची आणि हिंदू देवतांची पूजा करीत असत, धार्मिक सहिष्णुता हा भारतीय जीवनातला प्रभावी गुण होता. देशभर विखुरलेल्या प्राचीन विहारांमधून असंख्य भिक्षू राहात व पूर्वापार शिस्तीने जीवन कंठीत. पण त्यांची मते सारखीच असत असे नाही. ज्यातून शाकाहारी राहणी प्रचारात आली अशा अहिंसेच्या तत्त्वाने बौद्ध धर्म व हिंदू धर्म या दोन्हींवर सारखाच पगडा बसविलेला होता. उलटपक्षी ज्या वर्णाश्रमाला बुद्धाने विरोध केला होता, तो मात्र अद्याप तगून राहिला होता.



## ह्यूएनत्सांगच्या दृष्टीतून भारत

फा-हिएननंतर दोनशे वर्षांनी आणखी एक चिनी प्रवासी भारतात आला. त्याचे नांव ह्यूएनत्सांग. त्याने आपल्या 'प्रवासी' किंवा 'पश्चिमी देशांविषयीचे लेख' नामक वीस पुस्तकांमध्ये, भारतभर केलेल्या दीर्घ प्रवासात आपण काय काय पाहिले ते सर्व सविस्तर नमूद केले आहे.

ह्यूएनत्सांग हा चीनमधील एका जुन्या, प्रतिष्ठित कुळात जन्मला. कुटुंबातला तो सर्वांत धाकटा मुलगा. फार बुद्धिमान म्हणून वडिलांनी त्याला वयाच्या तेराव्या वर्षीच त्याच्या मोठ्या भावाच्या देखरेखीखाली एका मठात अभ्यासासाठी ठेवला. प्रवेश मिळविण्यासाठी त्याला नेहमीची परीक्षाही द्यावी लागली नाही. सर्व ख्यातनाम धार्मिक पाठशाळांना भेटी देण्यात त्याने सात वर्षे घालविली. या अनुभवाने भिक्षु-जीवनाबद्दल त्याला आदर वाटू लागला आणि स्वतः भिक्षू (भिखू) होण्याचे त्याने ठरविले.

विसाव्या वर्षी ह्यूएनत्सांग पूर्ण शिक्षित भिक्षू झाला. त्याला आता असे जाणवू लागले की बौद्ध धर्माबद्दल लोकात बरेच अज्ञान आहे. आपण भारतात जाऊन मूळ धर्मग्रंथांचे अध्ययन केले तर आपल्या बऱ्याच शंका दूर होतील असे त्याच्या मनाने घेतले, आणि फा-हिएनप्रमाणे त्यानेही वयाच्या एकोणतिसाव्या वर्षी भारतातल्या तीर्थक्षेत्रांना भेटी देऊन तिथल्या बौद्ध विद्वानांबरोबर




ह्यूएनत्सांग

अध्ययन करण्याचा व बुद्धाने दिलेल्या शिकवणीचे सम्यग ज्ञान मिळवण्याचा निश्चय केला.

चीनच्या बादशाहाने त्याला जाण्याची परवानगी नाकारली; पण तो इ. स. 629 मध्ये गुपचूप पळाला. त्याच्या यात्रेचा आलेख पाहिला तर :असे दिसते की उत्तरेकडून तो भारतात आला आणि दक्षिणेकडच्या मार्गाने मायदेशी परतला. त्या काळात प्रवासाच्या सोयी फारच तुटपुंज्या होत्या. वाळवंटे, पहाड व दऱ्याखोरी यांनी भरलेला 15,000 मैलांचा अनोळखी मुलूख तुडविताना त्याला भीषण संकटांना व अडचणींना तोंड द्यावे लागले. फा-हिएनप्रमाणे ह्यूएनत्सांगही घर सोडून पंधरा वर्षे वणवण भटकत होता. (इ. स. 629 – 644) यापैकी बहुतांश काळ त्याने हर्षाच्या साम्राज्यात आणि भारतभर भटकण्यात घालविला.

फा-हिएनच्या मागून दोनशे वर्षांनी त्याच भूमीवर बौद्ध धर्माला कोणती स्थिती आलेली होती? – ह्यूएनत्सांग त्याबद्दल काय म्हणतो? बौद्ध धर्माला अतिशय मान असे, आणि मध्य आशियातल्या राजांनी या यात्रेला हरप्रकारे मदत केली. विशेषत: एका राजाने तर त्याला फारच उत्तम वागविले. ह्यूएनत्सांगने आपल्या राज्यातच कायम वास्तव्य करावे आणि लोकांना बौद्ध धर्माचे मार्गदर्शन करावे असा त्याचा आग्रह होता. ह्यूएनत्सांगला वाईट वाटले; तो व्यथित झाला....आपण येवढ्या लांब भारतात आलो ते यासाठी खासच नाही. त्याला अशी भीती वाटली की राजा कदाचित जबरदस्तीने आपल्या राज्यात ठेवून घेईल. त्याने अन्न सत्याग्रह सुरू केला. राजाला ते कळल्यावर त्याचे मन विरघळले. त्याने ह्यूएनत्सांगला जाण्याची परवानगी दिली; मात्र परत जाताना पुन्हा इथे येऊ असे त्याच्याकडून वचन मिळविले.

निरंतर हिमाने आच्छादलेले पर्वत ओलांडून ह्यूएनत्सांग आधी उतरला तो एका तुर्की राज्यात. इथल्या खानाने भव्य भरजरी शामियान्यात आपला दरबार भरविला

होता. त्याला व त्याच्या अमीर उमरावांना दारूचा व संगीताचा भलता शौक होता. ह्यूएनत्सांगला दरबारात बोलावून त्याने त्याचा सत्कार केला. त्याचे पुढले बेत ऐकून खान म्हणाला, "हिंदुस्थानात कशाला जातोस? भलता गरम देश तो. आणि तिथले लोक बाहेरच्यांशी फार उद्धटपणे वागतात म्हणे." पण ह्यूएनत्सांगचा निश्चय झालेला होता. खानालाही त्याच्या मार्गात अडथळे आणायचे नव्हते. उलट त्याने प्रवासाच्या दृष्टीने त्याला खूप मदत केली. अफगाणिस्तानातल्या लोकांची भाषा ह्यूएनत्सांगला कळणार नाही हे ओळखून त्याने त्याच्याबरोबर एक वाटाड्या दुभाषी दिला.

बाल्ख आणि बनियान देशात ह्यूएनत्सांगला असे आढळले की 500 वर्षांपूर्वी कनिष्काने ज्या बौद्ध धर्माची इथे मुहूर्तमेढ रोवली तो अजूनही चांगला उत्कर्षावस्थेत आहे. कितीतरी शिला-स्मारके व अवशेष त्याला बघायला मिळाले. फा-हिएनप्रमाणे त्यालाही बुद्धाची पाण्याची सुरई, त्याची केरसुणी आणि एक दात या वस्तू दाखविण्यात आल्या. तिथल्या विहारामधून राहाणारे हजारो भिक्षू या वस्तूंची सणावारी पूजा करीत असत.

हिंदुकुश पर्वत ओलांडल्यावर तो काबूलच्या खोऱ्यात उतरला. तेथे बौद्ध हाच प्रचलित धर्म होता. बुद्धाची जी जी स्मारके त्याने पाहिली त्या बहुतेकांचा कोणत्या ना कोणत्या चमत्काराशी संबंध होता. बुद्धाच्या निर्वाणानंतर हजार वर्षांनी आपण खडकाच्या गुहेत त्याची छाया पाहिली असे ह्यूएनत्सांगलाही श्रद्धापूर्वक वाटते.

भारतात तो प्रविष्ट झाला तो बहुधा खैबर खिंडीतून आला असावा. वायव्य भागातील बहुतेक शहरे व गावे त्याला ओसाड वाटली. फक्त पेशावरचे खोरे—आज आहे तसेच—धान्यांनी व फळांनी समृद्ध होते. उसापासून गुळीसाखर करतात हे पाहून मेगॅस्थनीजप्रमाणे त्यालाही आश्चर्य वाटले. पुरुषपूर (पेशावर) इथे त्याला असे कळले



की खिस्तपूर्व चौथ्या शतकात होऊन गेलेला व्याकरणकार पाणिनी याच भागातला. लगेच उत्तरेला स्वातकडे जाऊन त्याने त्याच्या जन्मभूमीचे दर्शन घेतले.


सिंधू नदी ओलांडून तो सरळ काश्मीरमध्ये आला. कनिष्कापासूनच या प्रांताची विद्वत्तेबद्दल ख्याती होती. तिथे त्याला कितीतरी स्तूप आणि विहार बघायला मिळाले. विहारांत भिक्षू राहात असत. काश्मीरच्या राजाने त्याचा बहुमान केला आणि हव्या त्या ग्रंथातले उतारे लिहून काढण्यासाठी वीस लेखनिक त्याच्या मदतीला दिले. आपले काम पुरे करण्यासाठी ह्यूएनत्सांग इथे दोन वर्षे राहिला.

काश्मीरहून परतताना तो चेह–का (बहुधा 'सकाला' म्हणजे हल्लीचे पश्चिम पाकिस्तानातले सियालकोट असावे) मधून आला. ह्यूएनत्सांग म्हणतो की हे गाव हलक्याफुलक्या तलम मलमलीबद्दल प्रसिद्ध आहे. कुलू आणि जलंधर (जालंदर) मधून मथुरेकडे जात असता तो हर्षाच्या राज्यातून गेला. हर्ष हा त्या काळचा उत्तर भारतातला बलाढ्य सम्राट. ह्यूएनत्सांग म्हणतो की ठाणेश्वर आणि कुरुक्षेत्राभोवतालचा मुलूख हे अनादिकाळापासून धर्मक्षेत्र मानले जाते.

मथुरेहून पुढे कनोजकडे जात असता भारताची पवित्र नदी जी गंगा तिचा उल्लेख ह्यूएनत्सांगच्या लिखाणात येतो. तो म्हणतो. "या नदीत स्नान केल्याने सर्व संचित पापे धुतली जातात. जे लोक या नदीतील पाण्याने स्नान करतात त्यांचा स्वर्गात पुनर्जन्म होतो. या नदीत ज्याच्या अस्थींचे विसर्जन होते त्याला नरकाची भीती नाही." शेकडो वर्षांपूर्वी प्रस्थापित झालेली ही समजूत आजच्या हिंदू समाजातही कायम आहे.

कनोजचे राज्य शिलादित्याच्या (हर्षवर्धन) अंमलाखाली होते. ह्यूएनत्सांगच्या लेखांवरून असे दिसते की हर्ष हा एक सज्जन व सामर्थ्यशाली राजा होता. त्याने आपल्या राज्यात सगळीकडे प्रवाशांसाठी विश्रामगृहे आणि बुद्ध विहार बांधले होते.


गंगेतून खाली प्रवास करताना ह्यूएनत्सांगच्या नौकेवर चाचे लोकांनी हल्ला केला. हे लोक दुर्गा देवीचे भक्त होते आणि नंतरच्या काळातील ठगांप्रमाणे ते देवीला नरबळी देत. बळी म्हणून सर्वांत देखणा पुरुष त्यांना हवा होता, म्हणून त्यांनी ह्यूएनत्सांगची निवड केली. ह्यूएनत्सांगने आपण भ्याले आहोत असे मुळीच दाखविले नाही. "मरणापूर्वी मला बुद्धाची प्रार्थना करू द्या." येवढीच त्याने विनवणी केली. चाचे लोकांना जेव्हा कळले की हा धर्माचा माणूस आहे आणि



ह्यूएनत्सांगच्या नौकेवर चाचे लोकांचा हल्ला।

इतक्या दुरून आलेला आहे, तेव्हा त्यांनी त्याला जीवदान तर दिलेच, पण इतर प्रवाशांचे सामानही त्यांना परत केले.

ह्यूएनत्सांग प्रयाग (हल्लीचे अलाहाबाद) ला पोहोचला. तेथे त्याला फारच थोडे बौद्ध भेटले. तेथून पुढे त्याने अनेक गावांना भेटी दिल्या – श्रीवस्ती, कपिलवस्तू, गया, वैशाली, पाटलिपुत्र आणि राजगृह. ही सर्व ठिकाणे भगवान बुद्धाशी संबंध आल्यामुळे पवित्र बनली होती. एकेकाळची तीर्थक्षेत्रे फा-हिएनच्या काळी जेवढी ओस पडली होती त्यापेक्षाही अधिक ओस पडलेली ह्यूएनत्सांगला दिसली. अशोकाने बांधलेली अनेक स्मारकेही आता छिन्नभिन्न झालेली होती.



नग्न साधू

बनारस शहरात मात्र त्याला अजिबात निराळे दृश्य दिसले. वस्ती व संपत्ती या दोन्ही दृष्टींनी शहर भरभराटलेले होते. बहुतेक लोक शंकराची भक्ती करीत व ब्राम्हणांना मान देत. बौद्ध लोक फारच थोडे होते. साधु इतस्ततः भटकताना दिसत. त्यातील काही नग्न असत, काहींनी अंगाला भस्म चोपडलेले असे; बहुतेकजण या मर्त्य जीवनापासून मुक्ती मिळावी म्हणून तप, हठयोगाचे आचरण करीत.

आपल्या इष्टस्थळी म्हणजे मगध शहरात ह्युएनत्सांग पोहोचला आणि पाच वर्षे तेथे



राहिला. मगधाचे त्याने मोठ्या उत्साहाने वर्णन केले आहे. तो स्वतः नालंदाच्या विहारात राहात असे. तेथे 10,000 भिक्षू असत. तेथेच तो संस्कृत शिकला आणि अलोट ज्ञान त्याने संपादन केले.



ध्यानमग्न साधू

नालंदा मगध शहराच्या डोंगराळ भागात होते. बुद्धाला ज्ञान प्राप्त झाले ते याच ठिकाणी. भाविक राज्यकर्त्यांनी तिथे भव्य इमारती बांधल्या होत्या. जिकडे तिकडे मनोरे व बुरूजं डोकी काढीत होते; आणि ओढ्याचे वाहते पाणी व वृक्षांच्या राया यामुळे हवा नेहमी थंड व ताजीतवानी असे. इथे सहा विहार होते आणि त्या सर्वांभोवती एकच भिंत होती. ज्या इमारतीत भिक्षू राहात ती सहा मजली होती. राजा आणि आसमंतातील लोक मिळून या 10,000 भिक्षूंचा चरितार्थ चालवीत. नालंदा हे भारतातले त्या काळातले सर्वांत मोठे विद्यापीठ. बौद्ध वाङ्मयाखेरीज विज्ञानाच्या सर्व शाखांचा इथे अभ्यास होत असे – वेदापासून ते वैद्यक व गणितापर्यंत. या चिनी यात्रेकरूप्रमाणे दुसरे किती तरी परदेशी विद्यार्थी आपले अज्ञान काढून टाकण्यासाठी इथे येत. त्यांच्या चालू ज्ञानाची कसून परीक्षा घेऊन मगच त्यांना प्रवेश दिला जाई. दहापैकी एकदोघांना प्रवेश मिळे. दररोज शंभर प्राध्यापक व्याख्याने देत आणि त्यांच्यापैकी प्रत्येकाने दहा किंवा जास्तच पुस्तके लिहिलेली असत. भिक्षूंना कपडे, अन्न, निवास आणि औषधपाणी विनामूल्य असे. विहाराचे वरिष्ठ अधिकारी शीलभद्र हे

अतिशय विद्वान व गुणसंपन्न होते. ह्यूएनत्सांगने पूज्यभावाने त्यांना वंदन केले आणि आचार्यांनीही या शिष्याला बहुमानाने वागविले. दोन विद्यार्थी त्याची सर्वतोपरी काळजी घेत असत; त्यातला एक श्रमण होता आणि दुसरा ब्राम्हण. रोज त्याला ते बाहेर घेऊन जात ते रथातून, हत्तीवरून किंवा पालखीतून.

मगध सोडल्यानंतर ह्यूएनत्सांग साऱ्या भारतभर हिंडला. पहिल्याने तो चंपा, कर्ण–सुवर्णा, समतटा आणि ताम्रलिप्ती या राज्यांत गेला. तेथून पुढे तो ओरिसाच्या पूर्व किनाऱ्यावरून जात जात कलिंग देशात शिरला. तेथून पुढे दक्षिण कोसल वा बेरारातून तो आंध्रमध्ये गेला. दक्षिणेला द्रविड प्रांतातल्या कांचीपुर (कांजीवरम) पर्यंत गेल्यावर तो कोंकणपुराकडे गेला. हे कोंकणपुर कोणते याचा अजून उलगडा झालेला नाही. नंतर पश्चिमेकडे वळून तो महाराष्ट्रात शिरला. इथे अशोकाने बांधलेली अनेक बौद्ध स्मारके त्याने पाहिली. महाराष्ट्रीयांबद्दल तो म्हणतो, "मला ते मानी व लढवय्ये वाटले. आपले भले करणाराबद्दल ते कृतज्ञ असतात आणि वाईट करणारांशी सूडबुद्धीने वागतात. संकटात शरण आलेल्यासाठी ते स्वतःचे बलिदान करतील; आणि आपल्याला अपमानाने वागवणाऱ्यांशी रक्ताचा शेवटचा बिंदू सांडेपर्यंत लढत राहतील." ह्यांनाच हाताशी धरून दुसऱ्या पुलकेशीने हर्षाविरुद्ध विजय मिळविला होता, असे हे लोक.

महाराष्ट्रातून पुढे ह्यूएनत्सांग भडोच मार्गाने माळव्यात गेला. तेथील लोक त्याला वृत्तीने सौम्य, विनयशील आणि सुसंस्कृत वाटले. बहुतेक लोक बुद्धीने प्रखर, बोलण्यात आदबशीर आणि शिक्षणाने उदार असत. माळव्याहून तो सौराष्ट्रात गेला; आणि तेथून उत्तरेकडे सिंध, मुलतानवरून मकरानपर्यंत गेला. इराणच्या हद्दीवरून तो परत फिरला. सिंधू नदी ओलांडून पुन्हा एकदा त्याने मगध गाठले आणि नालंदात पुन्हा बिऱ्हाड थाटले.

महान आचार्य शीलभद्र यांच्या मार्गदर्शनाखाली ह्यूएनत्सांगने नालंदात



विद्यार्थ्यांना शिक्षण दिले. संस्कृतात त्याने अनेक ग्रंथ लिहिले आणि विद्वानांशी वादविवाद किंवा शास्त्रार्थ केला. आसामच्या राजाने त्याला आपल्या राज्यात बोलाविले आणि आसामअधिपतीच्या संगतीत असतानाच त्याने सम्राट हर्षवर्धनाला प्रथम पाहिले. ह्यूएनत्सांगने आपल्या बरोबर कनोजला यावे म्हणून हर्षाने त्याचे मन वळविले. कनोजला बौद्धांची मोठी सभा भरली होती. सभेला हर्ष आपल्या १८ मांडलिक राजांच्या परिवारासह आला. सभेत 3000 भिक्षू आणि 2000 ब्राम्हणांनी भाग घेतला होता. शिवाय नालंदाच्या विहारातले सुमारे 1000 भिक्षू होते ते वेगळेच. या प्रचंड समुदायाची बसण्याची सोय व्हावी म्हणून दोन मोठे मंडप बांधले होते. बुद्धाच्या सुवर्ण मूर्तीची एक अतिशय भव्य मिरवणूक काढण्यात आली. पहिल्याने सम्राटाने त्या मूर्तीला अभिवादन केले. मग सर्व सभाजनांनी–मंत्री, अधिकारी सर्वांसह क्रमशः वंदन केले. भिक्षूंना देणग्या देण्यात आल्या आणि मग या सभेचे अध्यक्षस्थान मंडित करण्याची हर्षाने ह्यूएनत्सांगला विनंती केली.

ह्यूएनत्सांगने एका मोठ्या वादात भाग घेतला आणि विरुद्ध मताच्या पंडित मंडळीपेक्षा आपले विचार कसे श्रेष्ठ आहेत ते सिद्ध करून दाखविले. त्याच्या विवादपटुत्वाची हर्षाने स्तुती केली आणि म्हटले, "आपल्याला माहीत आहेच की सूर्य उगवताक्षणी त्याच्या दिव्य तेजापुढे काजव्याचा क्षीण प्रकाश लोपतो; किंवा मेघगर्जना होताच त्या नादात कामगारांच्या हातोड्यांचे घण ऐकू येईनासे होतात. तसा प्रकार आता झालेला आहे. ज्यांनी सदोष युक्तिवाद केले त्यांची तोंडे अकस्मात बंद झाली आहेत." यानंतर हर्षाने ह्यूएनत्सांगला हत्तीवर आपल्या शेजारी बसवून मिरवणूक काढली आणि या चिनी विधिविशारदाची विद्वत्ता केवढी आहे ते लोकांना जाहीरपणे सांगितले.

ह्यूएनत्सांगला आता मायदेशी परतायचे होते. पण हर्षाने त्याला जाऊ दिले नाही. नालंदा विद्यापीठातल्या भिक्षूंचा त्याने निरोप घेतल्यावर हर्षाने त्याला आपल्या



एका सभेच्या अध्यक्षस्थानी ह्यूएनत्सांग


बरोबर प्रयागला चलण्याची विनंती केली. प्रयागच्या संगमावर लवकरच सहावे पंचवार्षिक संमेलन भरणार होते.

हे संमेलन म्हणजे एक ऐश्वर्यशाली समारंभ होता. सम्राटाकडून दान घेण्यासाठी 500,000 लोक प्रयागला जमले होते. त्यांना वाटण्यासाठी अमाप सोने, चांदी व वस्त्रभूषणांचे ढीग आणलेले होते आणि ते ठेवण्यासाठी अनेक दालने बांधण्यात आली होती.

दानाला प्रारंभ होण्यापूर्वी धार्मिक पूजा-अर्चा झाली. पहिल्या दिवशी बुद्धाच्या एका सुवर्णमूर्तीची नेत्रदीपक मिरवणूक काढण्यात आली. दुसऱ्या दिवशी सूर्यदेवाची — आदित्याची मिरवणूक निघाली आणि तिसऱ्या दिवशी शंकराची. नंतर दानधर्माचा समारंभ दीड महिना चालू होता. ह्यूएनत्सांगलाही एक हजार सुवर्णमुद्रा देऊ करण्यात आल्या पण त्याने ती देणगी नाकारली. त्याला ज्ञान गोळा करायचे होते; द्रव्य नाही.

या संमेलनानंतर ह्यूएनत्सांगने बौद्ध साहित्याचा प्रचंड साठा बरोबर घेऊन भारत देश सोडला. बुद्धाच्या सहा मूर्ती त्याने बरोबर घेतल्या होत्या. त्यापैकी दोन सोन्याच्या होत्या, एक चांदीची होती आणि तीन चंदनाच्या होत्या. त्याशिवाय बुद्धाचे 150 अवशेष त्याने बरोबर नेले. 657 ग्रंथांचा त्याचा संग्रह नेण्यासाठीं 22 घोडे लागले. त्याने आपले उर्वरित आयुष्य या ग्रंथांचे संस्कृतातून चिनी भाषेत भाषांतर करण्यात घालविले. या कामात त्याने चिनी भिक्षूंची तसेच दोन भारतीय पंडितांचीही मदत घेतली.

ह्यूएनत्सांगला मुख्यतः धर्मात रस वाटे. सामाजिक रचनेत नाही हे उघडच आहे. चार वर्णांचा तो उल्लेख करतो; पण त्यांतल्या अनेक जातींचा करीत नाही. त्याही काळात जाती पोटजाती होत्या; पण त्याला त्या कळल्या नसाव्यात. स्त्रियांना दुसऱ्यांदा विवाह करण्याची परवानगी नसते असे तो म्हणतो. विद्यार्जन



हर्ष राजाचा एक शिलालेख

ब्राम्हणांपुरतेच मर्यादित असे. वयाच्या तिसाव्या वर्षापर्यंत ब्राम्हण धर्मग्रंथांचा अभ्यास करीत.


ह्यूएनत्सांग आणखी सांगतो की महत्त्वाच्या घडामोडींचे वृत्तान्त लिहिण्यासाठी भारतात खास माणसे नेमलेली असतात आणि भारताविषयी माहिती मिळविताना या वृत्तांताचा आपण उपयोग केला. लोकांच्या राहणीतील आत्यंतिक स्वच्छता पाहून त्याला विशेष आश्चर्य वाटले होते.

"भारतात सुमारे सत्तर प्रदेश असून ते सर्व स्वतंत्रपणे कारभार करतात" असे ह्यूएनत्सांग म्हणतो. राजाच्या सैन्याचे चार विभाग होते : पायदळ, घोडदळ, रथ आणि हत्ती. कित्येक वर्षांपासून चालत आलेले युद्धशस्त्रांचे प्रकारच अजून वापरात होते. अपराध्यांना फार कठोर शासन दिले जाई हे गृहीत धरूनही ह्यूएनत्सांगचेही



असे मत झालेले दिसते की कडक व तावडतोब शिक्षा केल्याने गुन्ह्यांचे प्रमाण कमी होते.

हिंदुकुश पर्वतापासून ते भरतखंडाच्या दक्षिण टोकापर्यंत तसेच ताम्रलिप्तीपासून ते सिंधपर्यंत किंबहुना त्याच्याही पलिकडच्या भागात, साऱ्या देशभर अशोकाचे स्तूप पसरलेले आपण पाहिले असे ह्यूएनत्सांग सांगतो. फा-हिएन व ह्यूएनत्सांग यांच्या हकीकती जुळवून पाहिल्या तर बुद्धाच्या जीवनाचे सम्यक चित्र डोळ्यापुढे राहते आणि बौद्धधर्माने भारतात व भारताबाहेरही किती खोलवर मुळे धरली होती याची कल्पना येते. बौद्धधर्मातले आचार कसे बदलत गेले आणि त्या धर्मातल्या बऱ्याच समजुती आत्मसात करून हिंदूधर्म आजच्या स्वरूपाला कसा पोहोचला याचेही प्रत्यंतर त्यावरून आपल्याला येते. उदाहरणार्थ, हिंदूधर्माचे एक वैशिष्ट्य घेऊ या – मूर्तिपूजा. ह्यूनत्सांग म्हणतो की बुद्धाचे पहिले चित्र तयार झाले ते मगधाधिपती बिंबिसारच्या कारकीर्दीत. कापडावर पडलेली बुद्धाची छाया रेखांकित करण्यात आली. मग तीत रंग भरण्यात आले. ह्यूएनत्सांगच्या म्हणण्याप्रमाणे बुद्धाची महिली मूर्ती चंदनाची करण्यात आली आणि ती कोसल राज्यात, हे आपल्याला आठवत असेलच. बुद्धाने मुर्तिपूजेविरुद्ध एवढे आदेश दिले असूनही हिंदूधर्माचे आकर्षण अद्यापि असल्यामुळे, बुद्धाच्या मूर्ती व चित्रे लवकरच सर्रास दिसू लागली. मुळात या मूर्ती वा पुतळे आणि चित्रे पूजेसाठी बनविलेली नसावीत; बुद्धाचे पवित्र अस्तित्व जाणवावे म्हणून ती वापरात आली असावीत असे दिसते. बरीच वर्षे लोटल्यानंतर मगच या प्रतिमांना चमत्कार व अंधश्रद्धा यांची लेणी चिकटविण्यात आली. त्यानंतर बुद्धाची चित्रे व मूर्ती याप्रमाणे त्याच्या स्मृतीचे अवशेष – उदाहरणार्थ, बुद्धाच्या अस्थी, रक्षा, त्याने वापरलेल्या खाजगी वस्तू यांचीही पूजा होऊ लागली. काळ जात चालला तसतशी या अवशेषांच्या संख्येत भरच पडत गेली. बुद्धाने ज्या ज्या स्थळांना भेटी दिल्या त्या दूरवरच्या ठिकाणी खडकांत त्याच्या पावलांचे ठसे उमटलेले दिसू लागले.



ह्यूएनत्सांगचा परत प्रवास

या सर्व स्थळांवर स्तुपे बांधण्यात आली. एकट्या अशोकाने अशी 84,000 पवित्र स्मारके बांधल्याची वदंता आहे.

नंतरच्या काळात बुद्धाच्या प्रमुख शिष्यांनाही असाच मान मिळू लागला. त्यांचीही प्रार्थनांनी व फुलांनी पूजा होऊ लागली. त्यांच्याच जोडीला मंदिरांतून व धार्मिक मिरवणुकींतून हिंदू देवताही पूजल्या जात. यामुळे दोन्ही धर्म एकमेकाजवळ आले.



अखेरीस यातूनच आजचा हिंदूधर्म तयार झाला व अनेक देवदेवतांची पूजा होऊ लागली. बुद्ध हा त्यापैकी एक देव.

मठामधून – विहारातून हीच प्रक्रिया घडून आली. बुद्धाने आपल्या भिक्षूंची एक प्रभावळ किंवा 'संघ' तयार केला होता; आपण घालून दिलेले नियम त्यांनी पाळावेत आणि आपला धर्म टिकवावा हा त्याचा हेतू होता. त्याप्रमाणे सर्व देशभर विहार बांधण्यात आले खरे, पण एक एकसंधी धार्मिक शक्ती म्हणून 'संघाची संघटना करण्याचा कोणताही प्रयत्न झाला नव्हता. विहारातले जीवन बुद्धापुरते मर्यादित राहिले नव्हते. हिंदूंनी व जैनांनी पण आपले मठ बांधले–कधी कधी तर बौद्धांच्या जोडीने. अजंठ्याच्या व वेरूळच्या लेण्यांत तसे दृश्य दिसते. कालगतीबरोबर दोन्ही तिन्ही धर्मांचे हे विहार किंवा मठही एकच रूप धारण करू लागले.

धार्मिक सहिष्णुतेचे हे तत्त्व हा भारताच्या सांस्कृतिक जीवनाचा एक विशेष गुण आहे. प्रत्येक व्यक्तीला आपल्या धार्मिक श्रद्धेप्रमाणे वागण्याचे स्वातंत्र्य असे. एखाद्या मुद्द्याचे आकलन व्हावे म्हणून धार्मिक शास्त्रार्थाचे वादविवाद घेतले जात. त्यांना 'शास्त्रार्थ' म्हणत. निरनिराळ्या पंथांच्या विद्वान मंडळीत मतभेद असत, पण ते युक्तिवादापुरतेच. परस्परांना समजून घेण्याची त्यांची वृत्ती कायम राही, तिला वादामुळे बाध येत नसे.


धार्मिक सहिष्णुतेची बीजे जीवनात सगळ्याभर आणि सर्व पातळीवर पसरलेली असत. सद्भावनेचा हा वारसा आपल्यामागे आहे म्हणूनच आपण आपली आजची राज्यघटना तयार करू शकतो. जेथे मनुष्यांच्या जातीचा, धर्माचा किंवा शास्त्राचा विचार न करता त्यांना समानतेने वागविले जाते आणि स्वतःच्या सुखसाधनेसाठी समान संधी दिली जाते असे धर्मनिरपेक्ष राज्य आपण निर्मू शकलो.

# अलबरुनीचा भारत

प्राचीन भारताला भेट देऊन गेलेला चौथा महत्त्वाचा प्रवासी एक मुसलमान विद्वान होता. अब्रू रैहन हे त्याचे नाव : पण त्याला अलबरुनी म्हणून ओळखतात.

मध्य आशियातल्या खिवा प्रांतात इ. स. 973 मध्ये जन्म पावलेला हा अलबरुनी पुढे मोठा विद्वान म्हणून मान्यता पावला. वयाची चाळिशी गाठीपर्यंत विज्ञान, गणित, खगोलशास्त्र व ग्रहज्योतिष या विषयांवरच्या सर्व अरबी ग्रंथांत त्याने पारंगतता मिळविली. आपल्या मायभूमीत राहूनच त्याने आपले वाङ्मयीन कार्य पुढे चालू ठेवले असते, पण मोठी विचित्र घटना त्याच्या आड आली. गझनीच्या सुलतान महंमदाने खिव्यावर स्वारी केली. 11व्या शतकाच्या सुरवातीला हिंदुस्थानवर ज्याने पुन्हा पुन्हा स्वाऱ्या केल्या तोच हा गझनीचा महंमद. सुलतानाने सबंध खिवा कब्ज्यात घेतले आणि देशातल्या निरनिराळ्या टोळीप्रमुखांना व त्यांच्याबरोबर अलबरुनीलाही कैद करून गझनीला नेले. पुढे त्यांना हद्दपार करण्यात आले आणि खिव्यापासून दूर कुठेतरी राहण्याचा त्यांच्यावर हुकूम बजावण्यात आला. तेव्हा अलबरुनीची स्वारी भारतात आली.

अलबरुनीने आपली अज्ञातवासाची वर्षे संस्कृत वाङ्मयाचा अभ्यास करण्यात घालविली. अरबी भाषेत त्याने अनुवादित वा स्वतंत्र अशी सुमारे वीस पुस्तके लिहिली : त्यांत भारतावरचे त्याचे लिखाण सर्वांत प्रसिद्ध आहे. या विद्वान लेखकावर हिंदू तत्त्वज्ञानाने मोहिनी घातली होती.



अलबरुनीने वणन केलेली भारतीय खगोलविद्या

भारतातल्या धार्मिक, वाङ्मयीन व शास्त्रीय परंपरेचे वर्णन करणे हा त्याचा प्रधान हेतू होता. पण या देशाविषयी येथील लोकांचे शिष्टाचार, चालीरीती व लोकभ्रम यांबद्दलही त्याने आपल्याला बहुमोल माहिती दिलेली आहे.

अलबरुनी म्हणतो की हिंदुस्थान म्हणजे आपण ज्याला उत्तर भारत म्हणतो तो – मुळात एक समुद्र होता. हिमालयातून वाहात येणाऱ्या प्रचंड नद्यांनी शतकानुशतके जी गाळाची माती वाहून आणली तिने तो भरला. आधुनिक शास्त्रज्ञांनीही या विधानाला पुष्टी दिलेली आहे. पण दुसऱ्या कोणत्याही प्रवाशाने हा उल्लेख केलेला नव्हता.

भारतातील पर्वत व नद्या यांचा थोडक्यात नामनिर्देश करूनच तो थांबला नाही. कनोजपासून निरनिराळी महत्त्वाची ठिकाणे किती अंतरावर आहेत – कनोज हे त्या काळी उत्तर भारताचे केन्द्र मानले जाई – त्याचाही तपशील त्याने आपल्याला दिला आहे. यापैकी काही स्थळे म्हणजे आज केवळ दगडमातीच्या राशी किंवा उद्ध्वस्त शहरे म्हणून बघायला मिळतात.



शरव नावाचा एक विचित्र प्राणी

भारतातल्या प्राण्यांविषयी लिहिताना अलबरुनी म्हणतो की उत्तर हिंदुस्थानातील नद्या मगरींनी गजबजलेल्या असतात. कितीतरी भागांत गेंडे आढळत. पण याचबरोबर मेगॅस्थनीजप्रमाणे याही लेखकाने अद्भुत प्राण्यांचा उल्लेख केला आहे. कोणीतरी त्याला असे सांगितले की कोकणच्या सखल प्रदेशात शरभ नावाचा एक पशू हिंडताना आढळतो. नेहमीचे चार पाय तर त्याला असतात, पण शिवाय पाठीवर चार पाय असतात. याचा आकार रेड्यासारखा असून तो गेंड्यापेक्षा मोठा असतो. हा मोठा आडदांड व क्रूर असतो आणि आपले सावज उचलून तो पाठीवरच्या पायांमध्ये अडकवून टाकतो. कधी कधी चिडला की तो डोंगर चढून जातो आणि कड्यावरून उडी घेऊन घनगर्जनेशी युद्ध करतो. अलबरुनीला असेही कळले की भारतात चार डोळ्यांची काळवीट किंवा सांबरे असतात.

मेगॅस्थनीज व अलबरुनी यांच्या वृत्तांतात एक फरक मात्र जाणवतो. सोने खोदणाऱ्या मुंग्यांविषयी त्या ग्रीक प्रवाशाला जे सांगण्यात आले त्यावर त्याने डोळे मिटून विश्वास ठेवला. शास्त्रीय मनोवृत्तीचा हा अरब मात्र शरभाविषयी किंवा काळविटाविषयी जे ऐकले ते नुसते नमूद करतो.

भारतीयांविषयी आणि त्यांनी मिळविलेल्या सिद्धीविषयी अलबरुनीच्या मनात बरेच लिहायचे होते. पण हे लोक समजायला कठीण आहेत असा त्याला अनुभव आला. त्यांचे साहित्य जुन्या संस्कृतात आणि तेही पद्यरूपांत होते. पुष्कळदा ते त्यांना मुखोद्गत असे. आणि संस्कृत ही भाषा अरबी व फारसी भाषांपेक्षा समजायला कठीण होती.

या खेरीज भारतीयांची वृत्तीही साहाय्य करण्याची नव्हती. ते अहंमन्य आणि संकुचित वृत्तीचे बनले होते. स्वतःचे शिष्टाचार व रीतीरिवाज यांविरुद्ध ते ब्र काढीत नसत आणि सर्व परकीयांच्या बाबतीत त्यांचा वाईट ग्रह असे. त्यांना ते म्लेंच्छ म्हणत आणि त्यांच्या चालीरीती, त्यांचे वागणे, इतकेच नाही तर त्यांचा



पोशाखसुद्धा तुच्छ लेखीत. का? तर केवळ आपल्यापेक्षा वेगळे म्हणून. अलबरुनीच्या शब्दांत सांगायचे तर "हिंदूंना वाटते, आपल्या देशाखेरीज जगात काही नाही; आपल्या राष्ट्रासारखे राष्ट्र नाही; आपल्या राजासारखा राजा नाही; आपल्या धर्मासारखा धर्म नाही; आपल्या विज्ञानासारखे विज्ञान नाही....आणि हे (आपले ज्ञान) आपल्या मधल्याच पण इतर जातीच्या लोकांनाही उपलब्ध होऊ नये म्हणून ते आटोकाट प्रयत्न करतात. परदेशी लोकांच्या बाबतीत अर्थात जास्तच."

अलबरुनीने जे रिवाज पाहिले, राहणीच्या ज्या तऱ्हा पाहिल्या, त्याबद्दल त्याने अनेक ठिकाणी उद्‌गार काढले आहेत. तो म्हणतो की, "हिंदू लोक आपले पाय आधी धुतात, मग तोंड वगैरे. आपली नखे ते लांब वाढवितात. ते एकेकट्याने जेवतात. पान चघळतात. जेवणापूर्वी मद्य पितात. घोड्याच्या उघड्या पाठीवर ते स्वार होतात. उजव्या बाजूला खंजीर ठेवतात. दुसऱ्याशी हस्तांदोलन करताना ते हाताच्या पंज्याची पाठ पकडतात. घरात शिरताना ते परवानगी मागत नाहीत. पण मग परवानगीशिवाय जात नाहीत. सभेत ते मांडी घालून बसतात. जवळ वडील माणसे असली तरी त्याची कदर न करता ते थुंकतात व नाक शिंकरतात. वस्तू दुसऱ्याला द्यायची असली तर ते ती त्याच्याकडे फेकतात. बुद्धिबळे खेळायला चौघे बसतात. दोघे नाही.

"पोशाखाबद्दल बोलायचे तर काही लोक कंबरेभोवती नुसते एक फडके गुंडाळतात. दुसरे काही लोक जास्त मोठे कापड घेऊन ते पायापर्यंत पोहचेल असे नेसतात. डोके व छातीचा वरचा भाग आणि गळा झाकण्यासाठी उत्तरीय किंवा 'सिदर' असते. स्त्रियांप्रमाणे पुरुषही कानात कुंडले व हातात कडी घालतात. खांद्यापासून शरीराच्या मध्यापर्यंत पोहोचणारा कुडता किंवा तोकडे सदरे स्त्रिया वापरतात."

भारतीयांची अलबरुनीने "अहंमन्य", "संकुचित" वृत्तीची म्हणून संभवना केली असली तरी त्यांच्यातल्या चांगल्या गुणांकडे त्याने दुर्लक्ष केलेले नाही. परमेश्वराचे खरे चित्र डोळ्यापुढे ठेवण्याबद्दल त्याने त्यांचे कौतुक केले आहे. हा आपला

अभिप्राय त्याने पतंजलीचे साहित्य व भगवद्‌गीता यांवर आधारला आहे. तो म्हणतो, "हिंदूंच्या मते ईश्वर हा एकमेव, अविनाशी आणि अनंत असा आहे. तो स्वयंकर्ता, सर्वशक्तिमान आणि सर्वज्ञ आहे. तो बीजमान आणि जीवनदाता आहे. तो शासन कर्ता व पालनकर्ता आहे."

पण सर्वच हिंदूंच्या बाबतीत हे खरे होते असे नाही. सर्वसामान्य अक्षरशून्य लोकांच्या ईश्वरविषयक कल्पना खालच्या पातळीवरच्या होत्या. मूर्ती करण्याच्या त्यांच्या पद्धतीबद्दल त्याला तिटकारा वाटे.

हिंदूंच्या धार्मिक आचारांचे अलबरुनीने सूक्ष्म निरीक्षण केले. त्याच्या म्हणण्या-प्रमाणे वाराणशी, पुष्कर, ठाणेश्वर आणि मुलतान यांसारख्या तीर्थक्षेत्रांची हिंदू लोक यात्रा करीत. मृतांच्या अस्थी ते पवित्र गंगेत फेकीत. दानधर्मावर त्यांचा विश्वास होता. काही खाद्यपदार्थ ते अशुद्ध समजत आणि पुण्य लाभावे म्हणून महत्त्वाच्या प्रसंगी उपवास करीत. ते अंधश्रद्ध होते आणि रोजच्या व्यवहारात ते शकुनांना महत्त्व देत. आपसातले तंटे ते शपथा घेऊन किंवा एखादे दिव्य करून सोडवीत. कायद्याकडे धाव घेणे त्यांना तितके पसंत नसे.

वर्णव्यवस्था किती कठोर होती त्याचे अलबरुनीने चित्र रंगविले आहे. जात शुद्ध राहावी म्हणून आंतरजातीय विवाहांना त्यांनी बंदी केली होती; प्रत्येक हिंदूने आपला पारंपरिक व्यवसाय केला पाहिजे अशी सक्ती असे. ब्राम्हणाने आयुष्यभर धार्मिक कृत्ये करावीत आणि इतरांनीही आपापले पिढीजात व्यवसाय करून आपल्या धर्माचे पालन करावे असा कटाक्ष असे. पण परमेश्वराची पूजा आपल्या आवडीच्या मार्गाने करण्याची प्रत्येकाला मुभा होती. एखाद्याने आपले जातिकर्म सोडले आणि तो दुसरे काही करू लागला तर ते पाप समजत; कारण त्यामुळे समाजव्यवस्थेला धक्का लागे. अशा रीतीने जात ही जन्माशी निगडित होत गेली; आणि सर्वांनी निःशंकपणे जातिभेदाचा स्वीकार केला.



अस्पृश्यांचे अस्तित्व अलबरुनीला जाणवले का ? उत्तर होय असे आहे. अति शूद्र व अस्पृश्य यांना त्याही काळी अतिशय हीन दर्जा असे. त्यांना अंत्यज म्हणत आणि ते गावाच्या किंवा शहराच्या बाहेर राहात. समाजरचनेत त्यांचे स्थान शूद्रांच्या खालचे असे. त्यांच्याही आठ जाती होत्या : डोंबारी, बुरूड किंवा ढाली बनविणारे; मच्छीमार करणारे कोळी आणि रानटी पशूंची व पक्ष्यांची शिकार करणारे पारधी, धोबी, चांभार आणि कोष्टी. आणखी काही वर्ग होते की ज्यांना कोणत्याही जातीत जागा नव्हती. उदाहरणार्थ : हाडी, डोंब, चांडाळ आणि भडताव. हे लोक घाणेरडी कामे करीत—गावाची सफाई वगैरे. त्यांचाही एक वर्ग बनलेला होता. धंद्यावरून ते ओळखले जात. ते मेलेल्या जनावरांचे मांस खात.

सामाजिक दृष्ट्या जाती एकमेकींपासून अलग पडलेल्या होत्या. एकाच जातीचे लोकसुद्धा जेवताना आपल्या पाटांच्यामध्ये आडोसा करीत किंवा कधी कधी दोघांमध्ये नुसती रेघ काढली तरी पुरत असे. प्रत्येकाला वेगळ्या ताटात अन्न वाढीत असत. एकाच थाळीतून सर्वांनी खाद्यपदार्थ उचलणे त्याज्य समजत.

पाच सिद्धांतांमध्ये भारतीय खगोलशास्त्र व ग्रहज्योतिष यांची जी माहिती आलेली आहे तिचेही विवेचन अलबरुनी करतो. पृथ्वी आणि तिचे ग्रह, त्यांचे आकारमान, परिभ्रमण व युती; चंद्र-सूर्याची ग्रहणे, अक्षांश-रेखांश, ताऱ्यांचे वेध घेण्याची साधने आणि अशाच इतर खगोलविषयक बाबींविषयी भारतीयांच्या कल्पना काय आहेत त्याचे त्याने वर्णन केले आहे. भारतीय गणिती व ज्योतिषशास्त्रज्ञ यांच्यापाशी ज्ञान होते. पण त्याची तर्कसंगती लावून ते तडीला नेण्याचे काम त्यांनी केले नाही. पृथ्वी, पदार्थ, अंतराळ व काळ आणि त्याची पुराणात सांगितलेली विभागणी यांच्या जन्माविषयीच्या परंपरागत कल्पना त्यांनी ग्राह्य मानल्या. यामुळे विज्ञानाची हानी झाली असे अलबरुनीचे म्हणणे आहे.



अलबरुनीचे एक जुने चित्र

वैद्यक ही ज्ञानाची शाखा खगोल शास्त्राइतकीच उच्च मानली जाई. चरक हा या विषयावरचा सर्वश्रेष्ठ लेखक समजत. आणि त्याच्या ग्रंथाचे भाषांतर अरबी भाषेतही झालेले होते. निरनिराळे मंत्र हाच सर्पविषावर उपचार होय असे समजत.




हीन धातूचे सोन्यात रूपांतर करण्याची किमया हिंदू लोक जाणत. इतकेच नाही तर त्यांना रसायन माहीत होते. रसायन म्हणजे रोग्याला बरा करण्याची आणि वृद्धाला तरुण करण्याची विद्या.

रसायनाच्या उपचाराने काय फळ मिळे याबद्दल मोठ्या मनोरंजक गोष्टी अलबरुनीने सांगितल्या आहेत. माळव्याचा राजा भोजदेव याच्या धार येथील राजवाडयात एक चांदीचा लांबलचक तुकडा होता. त्याची आख्यायिका अलबरुनी पुढे दिल्याप्रमाणे सांगतो :

एके दिवशी रसायनाचे अनुपान घेऊन माळवाधिपतीकडे एक मनुष्य आला आणि बढाई मारू लागला की आपल्याला अमरपणाचे रहस्य माहीत आहे. तो म्हणाला, महाराज, आपण जर उकळत्या तेलाच्या कढईत उडी घ्याल तर मी काही खास चूर्णे त्यात थोडया वेळाने टाकीन. या कृतीचा परिणाम म्हणजे आपल्याला अमरत्व प्राप्त होईल. पण राजा भ्याला. उकळत्या तेलात बुडी मारण्याचे त्याने नाकारले. तेव्हा आपले म्हणणे सिद्ध करण्यासाठी त्याने राजाजवळ ती चूर्णे देऊन ठेवली. कोणत्या क्रमाने कसकशी ती कढईत टाकायची हे त्याला सांगितले आणि त्याने स्वतःच तेलात बुडी मारली.

असे सांगतात की पहिल्याने त्या माणसाचा लोळागोळा झाला. पण लवकरच त्या गोळयाला आकार येऊ लागला. तेव्हा राजाने चूर्णे टाकायला सुरवात केली. शेवटचे चूर्ण टाकताना त्याचा हात एकदम थबकला. त्याला भीती वाटली, तो आपल्याशी म्हणाला, "हा मनुष्य जर अमर झाला तर तो माझे राज्य जिंकून घेईल." आणि म्हणून त्याने ते शेवटचे चूर्ण आत टाकलेच नाही. तेल निवल्यावर आत फक्त एक लांबच लांब चांदीचा भरीव तुकडा आढळला.

भारतात त्या काळी वजनमापे कोणती होती याची तपशीलवार माहिती अलबरुनीने दिली आहे. वजने वेगवेगळया ठिकाणी वेगवेगळी होती. कारण याचे परिमाण




उकळत्या तेलाच्या पिंपात माणूस

किंवा एकेक त्या त्या गावी पूर्वापार वापरात होते तेच वापरीत. एकाच वजनाची सक्ती नव्हती. एकेकाचे पोटविभाग पण काटेकोरपणे निश्चित करता येत नसत. यामुळे भिन्न प्रकारच्या जिनसाचे वजन नक्की करणे कठीण जाई आणि गणित चुके. अंतर मोजण्याच्या बाबतीतही हाच अनुभव येई. उदाहरणार्थ : मधल्या बोटाचे टोक व आंगठा यांच्या मधल्या अंतराला 'ताल' म्हणत. मनुष्याच्या तालाच्या 8 पट त्याच्या शरीराची उंची असे. पण तालातालात फरक असल्यामुळे खरी तुलनाच करता येत नसे.

हिंदू लोक डावीकडून उजवीकडे लिहीत. दक्षिणेत ते ताली पत्रावर लिहीत आणि ही पाने सुतळीने एकत्र बांधीत. उत्तरेत लोक तुझ्‌ा वृक्षाची साल तेल लावून घासून साफ करीत आणि ती कडक व गुळगुळीत झाली की तिच्यावर लिहीत. लिखाणाची पाने फडक्यात बांधून ठेवीत. त्याला पोथी किंवा पुस्तिका म्हणत. देवनागरी लिपीखेरीज प्रत्येक महत्त्वाच्या प्रांतात त्या लोकांची स्वतःची लिपी असे. सृष्टयोत्पत्तीचा शब्द म्हणजे ॐ कार. त्याने हिंदू लोक आपल्या ग्रंथांना प्रारंभ करीत. ही सुरुवात त्यांना आशीर्वचनाप्रमाणे वाटे आणि ईश्वराच्या एकात्मतेवरची त्यांची श्रद्धा आणखी दृढ होई.

अलबरुनीच्या वर्णनामधून अकराव्या शतकातील भारताचे जे चित्र डोळ्यापुढे उभे राहते ते असे : लोक वागण्यात संकुचित बनले होते. त्यांना बदल नको असे. सहन होत नसे. वर्णाश्रम पद्धतीने पक्की मुळे धरली होती आणि तिचे पालन इतक्या कसोशीने होत असे की पुष्कळदा एखाद्या विषयाची विशुद्ध चिकित्सा बाजूलाच राहून निरर्थक कर्मकांडाचे स्तोमच जास्त माजे. ह्यूएनत्सांगने भारताला भेट दिली तेव्हाचे खुले वादविवादही आता बाजूला पडले होते. लोक ज्ञानसंपन्न होते आणि बऱ्याच क्षेत्रांत त्यांनी पुष्कळ प्रगती केली होती हे खरे. पण उपयोगी काय आणि टाकाऊ काय हे त्यांना ठरविता येत नसे. तसेच, सिद्ध होणारे सत्य कोणते आणि





'तुझ' पर्णांचे पुस्तक

भ्रामक समजुती कोणत्या याचीही त्यांना पारख करता येत नव्हती. अलबरुनीच्या चटकदार शब्दांतच बोलायचे तर :

"पार गोंधळ उडालेल्या अवस्थेत ते आहेत. कोणतीही सुसंगत तर्कप्रणाली त्यांच्यापाशी नाही. आणि अगदी टोकाला जायचे तर त्यांचे विचार जमावाच्या मूर्ख कल्पनांमध्ये मिसळून गेल्यासारखे वाटतात. त्यांच्या गणितविषयक किंवा खगोल ज्ञानाला उपमा द्यायची तर मी असे म्हणेन की त्यात मोत्याबरोबर आमचा खजूर कालविलेला आहे – किंवा मोत्याचे व शेणाचे ते कालवण आहे म्हणा; अगर बहुमोल स्फटिक आणि साधे खडे यांचे ते मिश्रण आहे म्हणा. दोन्ही गोष्टी त्यांच्या नजरेला सारख्या वाटतात. कारण कठोर शास्त्रीय कार्यकारणपद्धती हाताळण्याइतके ते स्वतःला उंचावूच शकत नाहीत."